चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात
कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्र.एलस 1194/184/सेवा-5,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक: 28 मार्च 1995.

## शासन निर्णय

केंद्र शासनाने आपल्या कर्मचा-यांना चार वर्षातून एकदा देशात कोठेही जाण्यास "रजा प्रवास सवलत" ही योजना मंजूर केलेली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचा-यांनाही अशाप्रकारची "चार वर्षातून एकदा राज्यात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत" योजना लागू करण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचा-यांना देखिल चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठीची रजा प्रवास सवलत ही योजना खाली दर्शविल्याप्रमाणे मंजूर केली जावी.

2. या प्रवास सवलतीला यानंतर "रजा प्रवास सवलत" व सध्याच्या दोन वर्षातून एकदा स्वग्रामी जाण्यासाठी अनुज्ञेय असणा-या रजा प्रवास सवलतीला "स्वग्राम रजा प्रवास सवलत" असे संबोधिले जावे. ही रजा प्रवास सवलत महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमेच्या आत अनुज्ञेय राहील. राज्यात कोठेही जाण्याची ही प्रवास सवलत असल्याने, या रजा प्रवास सवलतीखाली प्रवास करावयाच्या अंतरासाठी किमान व कमाल अंतराची मर्यादा रहाणार नाही. परंतु या रजा प्रवास सवलतीचे ठिकाण घोषित करण्याची पूर्व अट राहील व मुख्यालय ते घोषित ठिकाण यासाठीचा प्रवास खर्च जवळच्या मार्गाने व प्रत्यक्ष तिकीट भाड्याच्या आधारावर अनुज्ञेय राहील.

3. या रजा प्रवास सवलतीसाठीच्या पहिल्या गट वर्षाची सुरुवात सन 1993 पासून झाली आहे असे समजण्यात यावे. त्यामुळे ही गट वर्षे 1993-96, 1997-2000 अशी असतील. या सवलतीचा फायदा घेतला गेल्यास संबंधित स्वग्राम रजा प्रवास सवलतीच्या गट वर्षाची स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय होणार नाही. या प्रवास सवलतीच्या चार वर्षाच्या गट वर्षात दोन स्वग्राम रजा प्रवास सवलती किंवा एक रजा प्रवास सवलत व एक स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय राहील.

4. जे शासकीय कर्मचारी, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:टीआरए 1163/2726/5, दिनांक 23 ऑक्टोबर 1963 च्या परिच्छेद-11 मधील सवलतीचा लाभ घेत असतील त्यांना अशी सवलत पुढे चालू ठेवावी किंवा या योजनेचा लाभ घ्यावा याबाबत विकल्प देता येईल.

5. या प्रवास सवलतीचा लाभ घेण्यासाठी प्रवास करण्याचे ठिकाण, अर्जाद्वारे लेखी घोषित करणे तसेच प्रवास सुरु करण्यापूर्वी सक्षम अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

6. स्वग्राम रजा प्रवास सवलतीसाठीच्या शासन निर्णय, वित्त विभाग क्र.टीआरए 1163/2726/5, दिनांक 23 ऑक्टोबर 1963 व त्यानंतर त्या संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील सर्व तरतूदी, या रजा प्रवास सवलतीसाठी आवश्यक त्या फेरफारासह लागू रहातील.

7. शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत या रजा प्रवास सवलतीवरील खर्च "मागणी क्रमांक:जी-8-2070, इतर प्रशासनिक सेवा, इतर खर्च (दोन) महागाई भत्ता, सुधारित वेतन, घरभाडे भत्ता इत्यादीसाठी ठोक तरतूद (2070 0521) या खालील शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्रमांक:आकनि 1195/234/अर्थसंकल्प-7, दिनांक 28 मार्च 1995 संगणक संकेतांक क्र.8000-234-9 अन्वये मंजूर केलेल्या रु.7.00 कोटी आकस्मिकता निधी अग्रिमातून करण्यात यावा. आहरण व संवितरण अधिका-यांनी सदर खर्च, अग्रिमाच्या प्रतिपूर्तीनंतर शेवटी कोणत्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावयाचा हे सूचित करावे. त्यानंतर रजा प्रवास सवलतीसाठीचा खर्च, स्वग्राम रजा प्रवास सवलतीचा खर्च ज्या प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. नियंत्रक अधिका-यांनी पूरक मागण्या विधानमंडळाने संमत करताच या बाबींवरील खर्च संबंधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

कृ.मा.प.

शा.म.मु./रोटा/एच-1513(20,000+20-4-95)

8. हे आदेश दिनांक 1 एप्रिल 1995 पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. वि. लागवणकर,
शासनाचे उप सचिव.

प्रति,

महालेखापाल-1 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-2 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-1 (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-2 (लेखापरीक्षा), महाराष्ट्र नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक